# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Website : www.dtemaharashtra.gov.in


अधिसुचना
कालमर्यादित दि. २५.०७.२०१७ ते २८.०७.२०१७

जा. क्र.१०/एनजीपी/प्रवेश प्रक्रीया/२०१७-१८/3761
दिनांक : 25 JUL 2017

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी पोस्ट एस एस सी थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेतील आय टी आय विद्यार्थ्यांच्या गुणामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यास मान्यता देणेबाबत. . .

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी पोस्ट एस एस सी थेट व्दितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेसाठी दोन वर्षाचा आय टी आय अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना थेट व्दितीय वर्षाचे प्रवेशा करीता केंद्रभुत प्रवेश प्रक्रीये मार्फत प्रवेश घेण्यास पात्र ठरविण्यात आलेले आहे.

सदरहु प्रवेश प्रक्रीये साठी दोन वर्षाचा आय टी आय अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी थेट व्दितीय वर्ष प्रवेशा करीता ऑन लाईन अर्ज भरताना फक्त तिसरे व चौथ्या सत्राचे मिळुन एकुण गुण भरणे आवश्यक होते. तथापी असे निदर्शनास आले आहे की, काही विद्यार्थ्यांनी चार ही सत्रांचे गुण भरले आहेत, तर काही विद्यार्थ्यांनी फक्त चौथ्या सत्राचे गुण भरले असुन संबधित सुविधा केद्रानी विद्यार्थ्यांनी भरलेला ऑन लाईन अर्जाची योग्य ती तपासणी न करताच विद्यार्थ्यांचा अर्ज confirm केलेला आहे. परिणामी पहील्या फेरीमध्ये seat अलॉट झालेले विद्यार्थी प्रवेश confirm करण्यासाठी Admission Reporting Centre मध्ये गेले असता वर नमुद केल्यानुसार चुकीचे गुण भरले गेलेले असल्याने एआरसी मध्ये सदरहु विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यात आलेले नाहीत. ऑन लाईन अर्ज भरताना विद्यार्थ्यांनी स्वत:चे चुकीचे गुण भरल्यामुळे तसेच सुविधा केंद्रावर ( Facilitation Centre) विद्यार्थाचे कागदपत्रानुसार विद्यार्थ्यांनी भरलेली माहीतीची अचुक पडताळणी न करताच विद्यार्थ्याचा ऑन लाईन अर्ज Confirm केल्यामुळे संबधित विद्यार्थी अलॉट झालेल्या पहिल्या फेरीतील प्रवेशास अपात्र ठरले आहेत.

सदरची सद्यस्थिती पाहता ज्या विद्यार्थ्यांनी वर नमुद केल्यानुसार चार ही सत्रांचे गुण अथवा फक्त चौथ्या सत्राचे गुण भरले आहेत अशा विद्यार्थ्यांचे हितास्तव संबंधित विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी फक्त तिसरे व चौथ्या सत्राचे मिळुन एकुण गुण भरण्याची परवानगी या संचालनालयामार्फत देण्यात येत आहे.

त्यासाठीचे दुरुस्ती करीता संबधित विद्यार्थ्यांनी स्वत:चे मुळ कागदपत्रासह जवळच्या Admission Reporting Centre मध्ये दि. २५.७.२०१७ ते दि. २८.७.२०१७ या कालावधीत उपस्थित राहुन सदरची दुरुस्ती करुन घ्यावी. तसेच सर्व Admission Reporting Centres नी विद्यार्थ्यांची मुळ कागदपत्रे तपासुन त्यांचे दोन वर्षाचे आय टी आय अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या तिसरे व चौथ्या सत्राचे मिळुन एकुण गुण भरण्याची कार्यवाही विहित कालावधीत प्रथम प्राधान्याने पुर्ण करावयाची आहे. सदरचे दुरुस्तीनंतर केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेत सामावुन घेण्यात येणार असुन अशा विद्यार्थ्यांना दि. २९.७.२०१७ रोजी अलॉटमेंट होणा-या कॅपच्या दुस-या फेरीसाठी पात्र ठरविण्यात येणार आहे.

तरी संबधित विद्यार्थ्यांनी तात्काळ जवळच्या Admission Reporting Centre (ARC) मध्ये मुळ कागदपत्रासह दि. २५.७.२०१७ ते दि. २८.७.२०१७ या कालावधीत उपस्थित राहुन योग्य ती दुरुस्ती करुन घ्यावी. जर संबंधित विद्यार्थ्यांनी विहित कालावधीत गुणामध्ये योग्य ती दुरुस्ती करुन घेतली नाही तर याबाबत संबंधित विद्यार्थ्यांची संपुर्ण जबाबदारी राहील.

(डॉ. सुभाष महाजन)
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रतिलिपी:- मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, बांद्रा (पुर्व), मुंबई यांना माहितीस्तव सादर.

**प्रत:- माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.**

1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपुर/नाशिक/पुणे.
2. प्रणाली विश्लेषक, कार्यासन क्र. 3, मुख्य कार्यालय, मुंबई.
3. प्राचार्य, सर्व सुविधा केंद्र व ए.आर.सी.
4. निवडनस्ती.

E/Desk 10/Admission 2017-18